# मोडीफाइड चेकलिस्ट फॉर ऑटिझम इन टॉडलर्स, रिवाइजड विथ फॉलो अप (एम-चैट-आर/ एफ )

**डायना एल. रॉबिन्स, पीएचडी**
**डेबोरा फीन, पीएचडी.**
**मेरिअन बार्टन, पीएच.डी.**

**आभार** ह्या दस्तऐवजात वापर करण्यात आलेल्या फ्लो-चार्टचे स्वरूप विकसित केल्याबद्दल स्पेनमधील एम-चैट अभ्यास गटाचे आभार.
अधिक माहितीसाठी कृपया www.mchatscreen.com पहा.
किंवा डायना रोबिन्स यांना DianaLRobins@gmail.com वर संपर्क साधा.

© 2009 Diana Robins, Deborah Fein, & Marianne Barton
Translated in Marathi by Dr. Avinash S. Bhosale (Pediatrician), 2019

**<u>वापरण्यासाठी परवानगी (Permissions for Use):</u>**

ऑडिझ्म इन टोडलर्ससाठी संशोधित चेकलिस्ट, फॉलो-अपसह सुधारित (एम-चैट-आर/ एफ; रॉबिन, फीन, आणि बार्टन, 200 9) ऑटिझम स्पेक्ट्रम डिसऑर्डरसाठी जोखमीचे मूल्यांकन करण्यासाठी 2-स्टेज पालक-अहवाल स्क्रीनिंग साधन आहे (एएसडी). एम-सीएटी-आर / एफ क्लिनिकल, संशोधन आणि शैक्षणिक हेतूंसाठी विनामूल्य डाउनलोडसाठी उपलब्ध आहे. एम-चैट-आर/फ आणि संबंधित सामग्रीचे डाउनलोड www.mchatscreen.com वरून अधिकृत केले आहे.

एम-चैट-आर/ एफ हा कॉपीराइट केलेला इन्स्ट्रुमेंट आहे आणि एम-सीएटी-आर / एफचा वापरासाठी खालील मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे आवश्यक आहे:

(1) एम-चैट-आर च्या पुनर्मुद्रण / प्रतिकृती वापरासाठी तळाशी कॉपीराइट समाविष्ट करणे आवश्यक आहे (© 200 9 रॉबिन्स, फीन आणि बार्टन). लेखकाच्या परवानगीशिवाय आयटम, निर्देश किंवा आयटम ऑर्डरमध्ये कोणतेही बदल केले जाऊ शकत नाहीत

(2) एम-चैट-आर पूर्णपणे वापरली जाणे आवश्यक आहे. पुरावे दर्शवितात की आयटमचे कोणतेही सबसेट्स पुरेशी मनोमितीय गुणधर्म दर्शवत नाहीत

(3) एम-चैट-आर/ एफ प्रिंटमध्ये (उदा. एक पुस्तक किंवा जर्नल लेख) प्रतिकृती करण्यास इच्छुक पक्ष किंवा इतरांसाठी इलेक्ट्रॉनिक वापरासाठी (उदा. डिजिटल वैद्यकीय रेकॉर्डचा किंवा इतर सॉफ्टवेअर पॅकेजचा भाग म्हणून) परवानगीची विनंती करण्यासाठी डायना रॉबिन्सशी संपर्क साधावा (DianaLRobins@gmail.com).

(4) वैयक्तिक वैद्यकीय व्यवसायाचा भाग म्हणून तुम्ही प्रथम चरण एम-चैट-आर तुमच्या रुग्णाच्या इलेक्ट्रॉनिक वैद्यकीय रेकॉर्डमध्ये (ईएमआर) समाविष्ट करू इच्छित असल्यास, तुमचे स्वागत आहे.

तथापि, आपण कधीही आपल्या ईएमआर पृष्ठास वैयक्तिक वैद्यकीय व्यवसायाच्या बाहेर वितरीत करू इच्छित असल्यास, डायना रॉबिन्सकडे परवाना कराराची विनंती करण्यासाठी कृपया संपर्क साधा.

**<u>वापर करण्या संबंधीच्या सूचना</u>**

डॉक्टर्स , व्यावसायिक किवा कुठलाही स्पेशलिस्ट १६ ते ३० महिन्याच्या मुलांमध्ये ऑटिझम (स्वमग्नता) ची तपासणी करण्या करीता M- CHAT- R चा वापर करु शकतो/ ते.

M- CHAT- R चा मुख्य उद्देश आहे की जास्तीत जास्त मुलांची तपासणी होऊ शकेल .

कधी -कधी असे ही होऊ शकते की जे मुल M- CHAT- R वर स्क्रीन पॉसिटीव्ह आहे. पण त्यांना ऑटिझम (स्वमग्नता) झालेला नसेल .ते माहित करून घेण्यासाठी फॉलो अप (M- CHAT- R / F ) प्रश्न तयार केलेले आहेत . असे ही होऊ शकते कि फॉलो अप नंतर सुद्धा मूल M- CHAT- R वर स्क्रीन पॉसिटीव्ह आहे पण त्यांना ऑटिझम (स्वमग्नता) झालेला नसेल परंतु त्या मुलांना इतर विकासा संबंधीच्या अव्यवस्था (DISORDER) किंवा विलंब असु शकतो त्या करता पुढे पूर्ण तपासणी करणे खुप आवश्यक आहे

© 2009 Diana Robins, Deborah Fein, & Marianne Barton
Translated in Marathi by Dr. Avinash S. Bhosale (Pediatrician), 2019

M- CHAT- R दोन  मिनिटा पेक्षा कमी वेळेत स्कोर करता ग़ेऊ शकतो.स्कोरिंगची पद्धत खाली दिलेली आहे. किंवा http://www.mchatscreen.com वरून सुद्धा डाउनलोड करु शकतात .

**स्कोरिंग  करण्याची पद्धत**

२, ५ आणि १२ आयटम ला सोडून इतर कुठल्याही आयटम चे उत्तर "**नाही** " असल्यास ऑटिझम (स्वमग्नता)  असु शकतो.

२, ५ आणि १२ आयटम चे  उत्तर "**होय** " असल्यास ऑटिझम (स्वमग्नता)  असु शकतो.

**कमी रिस्क : एकूण स्कोर ०-२**

जर मुलं २४ महिन्यापेक्षा लहान असेल तर दुसऱ्या वाढदिवसानंतर पुन्हा मुला सोबत ही चाचणी करा आपल्या डॉक्टरांकडून तपासणी करत रहा व त्यांचा सल्ला घेत राहा .

**मध्यम रिस्क : एकूण स्कोर ३ ते ७**

ज्या आयटम मध्ये ऑटिसम ची रिस्क आहे त्यांच्या करता फॉलो अप  (M- CHAT- R / F ) चा वापर करावा . जर (M- CHAT- R / F ) वर स्कोर २ पेक्षा जास्त असेल तर त्या मुलाची ऑटिझम (स्वमग्नता) ची चाचणी **पॉसिटीव्ह** आहे , त्याला/तिला पुढील तपास / निदानासाठी ऑटिझम (स्वमग्नता)  स्पेशलिस्ट कडे जाण्याचा सल्ला द्यावा . जर स्कोर ०-१ असा असेल तर ते मूल ऑटिझम (स्वमग्नता)  चाचणीवर निगेटिव्ह आहे आपल्या डॉक्टरांकडून तपासणी करत रहा व त्यांचा सल्ला घेत राहा .

**जास्त रिस्क: एकूण स्कोर ८ ते २० ---** फॉलो अप करण्याची आवश्यकता नाही सरळ निदाना च्या चाचण्यांकरिता पाठवून द्या.

© 2009 Diana Robins, Deborah Fein, & Marianne Barton
Translated in Marathi by Dr. Avinash S. Bhosale (Pediatrician), 2019

# M-CHAT-R ™ (एम-चैट-आर)

| |
|---|
| **कृपया आपल्या मुलांसंबंधित खालील प्रश्नांची उत्तरे दया. तुमचं मुलं नेहमी कसा वागतो हे लक्षात ठेवावे.**<br>**जर तुम्ही तुमच्या मुलामध्ये एखादी विशिष्ठ वागणे बऱ्याच वेळेस पाहिले असेल परंतु तसा तो/ती नेहमी वागत नसेल तर 'नाही ' वर गोल करा . कृपया प्रत्येक प्रश्नासाठी हो किंवा नाही वर गोल करा .**<br>**तुमचे खूप खूप आभार .** |

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | तुम्ही खोलीतल्या एखाद्या वस्तू कडे बोटाने इशारा केला तर तुमचे मुलं त्याकडे बघते का?<br>(**उदाहरणार्थ** जर तुम्ही एखाद्या खेळणे किंवा प्राण्याकडे इशारा केला तर तुमचे मुल त्याकडे बघते का?) | होय | नाही |
| 2 | तुमच्या मुलाला ऐकू येत नाही असे तुम्हाला वाटते का? | होय | नाही |
| 3 | तुमचे मुल बनावटी किंवा काल्पनिक खेळ खेळते का?<br>( **उदाहरणार्थ** जसे रिकाम्या कपातून पाणी पिण्याचे किंवा फोन वर बोलण्याचे नाटक करणे . बाहुली किंवा टेडी बेअर ला खाऊ घालण्याचे नाटक करणे ) | होय | नाही |
| 4 | तुमच्या मुलाला वस्तूंवर चढणे आवडते का?<br>( **उदाहरणार्थ** फर्निचर झोका किंवा पायऱ्यांवर वर चढणे) | होय | नाही |
| 5 | तुमचे मुल त्याची बोट त्याच्या डोळयासमोर असामान्य प्रकारे हलवतो का?<br>( जसे डोळयासमोर बोटं लवचिकपणे हलवणे) | होय | नाही |
| 6 | तुमच्या मुलाला काही हवे असल्यास किंवा काही मदतीसाठी तो/ती एका बोटाने इशारा करून सांगू शकतो/ते का ? ( जसे हवी असलेली खाण्याच्या वस्तू पर्यंत हात पोहचू शकत नाही किंवा खेळण्या कडे इशारा करणे) | होय | नाही |
| 7 | तुमचे मुलं एखाद्या रोचक वस्तू कडे एका बोटाने दाखवण्याचा प्रयत्न करते का ?<br>( **उदाहरणार्थ** आकाशात विमान , रस्त्यावरच्या एखाद्या ट्रककडे इशारा करणे) | होय | नाही |
| 8 | तुमचे मूल इतर मुलांमध्ये आवड आहे का?<br>( **उदाहरणार्थ** तुमचे मुल इतर मुलांना बघुन हसते किंवा त्यांच्या जवळ जाते) | होय | नाही |
| 9 | तुमचे मुल वस्तू तुमच्याकडे घेऊन येते का? मदतीसाठी नाही फक्त दाखवण्यासाठी<br>( **उदाहरणार्थ** फुल , टेडी बेयर किंवा खेळण्यातला ट्रक दाखवणे) | होय | नाही |

© 2009 Diana Robins, Deborah Fein, & Marianne Barton
Translated in Marathi by Dr. Avinash S. Bhosale (Pediatrician), 2019

| | | | |
|---|---|---|---|
| 10 | जर तुम्ही तुमच्या मुलाला नावाने हाक मारली तर तो/ती प्रतिसाद देतो/ते का ?<br>(**उदारणार्थ** तुम्ही तुमच्या मुलाला त्याच्या किंवा तिच्या नावाने हाक मारतात तेव्हा तो/ती वर पाहणे, बोलणे किंवा करत असलेले काम थांबवतो/ते का?) | होय | नाही |
| 11 | जेव्हा तुम्ही तुमच्या मुला/लीला बघून हसतात तेव्हा तो/ती सुद्धा हसतो/ते का ? | होय | नाही |
| 12 | तुमचे मुल रोजच्या आवाजाने त्रासून जाते का ?<br>(**उदारणार्थ** व्हॅकुम क्लीनर, प्रेशर कुकर, मिक्सर ग्राइंडर किंवा मोठ्या आवाजातले संगीत ऐकून ओरडतो/ते किवा रडतो/ते का ?) | होय | नाही |
| 13 | तुमचे मुल चालते का ? | होय | नाही |
| 14 | जेव्हा तुम्ही तुमच्या मुला/लीशी बोलतात , त्या/तीच्या सोबत खेळतात किंवा त्याला/तिला कपडे घालत असतात तेव्हा तुमचे मुल तुमच्याशी नजर लावते का ? | होय | नाही |
| 15 | तुमचे मुलं तुमची नक्कल करण्याचा प्रयत्न करते का ?<br>(**उदाहरणार्थ** टाटा करणे, टाळी वाजवणे , मनोरंजक आवाज जसे तुम्ही काढता तसे काढणे ) | होय | नाही |
| 16 | काही पहाण्यासाठी जर तुम्ही मान फिरवली तर तुमचं मुलं सुद्धा तुम्ही काय पहात आहेत त्याकडे मान वळवून पाहतो/ते | होय | नाही |
| 17 | तुमचे मुलं तुम्ही त्याच्याकडे पाहावे म्हणून प्रयत्न करते का ?<br>(तुम्ही त्याची प्रशंसा कराला या आशेने तो/ती " बघा! किंवा "मला बघा " असं म्हणतो. ) | होय | नाही |
| 18 | जेव्हा तुम्ही तुमच्या मुलाला काही करण्यासाठी सांगतात तेव्हा त्याला ते कळते का ?<br>(जसे की बिना इशारा किंवा संकेताने तुम्ही म्हणालात “कागद खुर्चीवर ठेव" किंवा दरवाजा बंद कर" तर त्या/तीला ते समजते का? ) | होय | नाही |
| 19 | जर काही नवं घडलं असेल तर, तुम्हाला कसं वाटते ते पाहण्यासाठी तुमचा मुलगा/गी तुमच्या चेहऱ्याकडे कडे पाहतो/ते का ?<br>(**उदाहरणार्थ** एखादया अपरिचित किंवा मनोरंजक आवाज ऐकून किंवा नवीन खेळणं पाहुन तो/ती तुमचा चेहरा पाहतो/ते का?) | होय | नाही |
| 20 | तुमच्या मुलाला/मुलीला जलद हालचालीच्या क्रिया आवडतात का ?<br>(जसे गुडघ्यांवर झुलवणे किंवा हवेत झुलवणे ) | होय | नाही |

© 2009 Diana Robins, Deborah Fein, & Marianne Barton
Translated in Marathi by Dr. Avinash S. Bhosale (Pediatrician), 2019

## M-CHAT-R Follow-Up (M- CHAT- R / F) एम-चॅट-आर फॉलो-अप (एम-चैट-आर/ एफ )™

ऑडिझम इन टोडलर्स, संशोधित, फॉलो-अप (एम-चैट-आर/ एफ; रॉबिन, फीन, आणि बार्टन, 2009) एम-चैट-आर सोबत वापरण्यासाठी तयार केली आहे. एम-चैट-आर/ एफ www.mchatscreen.com वरून डाउनलोड केले जाऊ शकते.

एम-चैट-आर/ एफ हा कॉपीराइट केलेला इन्स्ट्रुमेंट आहे आणि त्याचा वापर कॉपीराइट धारक लेखकांद्वारे मर्यादित केलेला आहे. एम-चैट-आर आणि एम-चैट-आर/ एफ क्लिनीकल, संशोधन आणि शैक्षणिकसाठी वापरली जाऊ शकते. जरी आम्ही हे साधन विनामूल्य वापरासाठी उपलब्ध करुन देत आहोत, हे कॉपीराइट साहित्य आहे आणि ते मुक्त स्त्रोत नाही. कोणत्याही व्यापारी किंवा इलेक्ट्रॉनिक उत्पादन हेतुसाठी एम-सीएटी-आर / एफ वापरण्यात स्वारस्य असलेले कोणीही डायना एल रॉबिन्स यांना परवानगी करीता mchatscreen2009@gmail.com वर संपर्क साधावा

### वापर करण्या संबंधीच्या सूचना (Instructions for use)

M- CHAT- R/F चा वापर M- CHAT- R च्या सोबत केला जातो. १६ ते ३० महिन्याच्या मुलांमध्ये ऑटिझम (स्वमग्नता) ची तपासणी करण्या करीता M- CHAT- R तयार केलेले आहे .

असे ही होऊ शकते कि फॉलो अप नंतर सुद्धा जे मूल M- CHAT- R वर स्क्रीन पॉसिटीव्ह आहे त्यांना ऑटिझम (स्वमग्नता) झालेला नसेल परंतु त्या मुलांना इतर विकासा संबंधीच्या अव्यवस्था किंवा विलंब (developmental disorders or delays ) असु शकतो त्या करता पुढे पूर्ण तपासणी करणे खुप आवश्यक आहे .

M- CHAT- R ला पूर्ण भरल्यावर, निर्देशांच्या आधारावर स्कोर करावे. जर मुलं पॉजिटीव्ह **(मध्यम रिस्क एकूण स्कोर ३ ते ७ )** आलेत तर केवळ फेल आयटम संबंधीचे फॉलो प्रश्न विचारावे

प्रत्येक पानावर M- CHAT- R चा एक आयटम आहे . **पास किंवा फेल** असे उत्तर मिळेलेपर्यंत फ्लो चार्ट प्रमाणे प्रश्न विचारावे. इंटरव्यू च्या दरम्यान आई वडिलांचे उत्तर "कदाचित " असे असू शकेल .

जर आई -वडील "कदाचित " म्हणाले , तर बहुतेकदा उत्तर " होय " किंवा "नाही " असे असते का ते विचारा आणि त्या आधारे पुढे जा. जर काही ठिकाणी "इतर काही " असं उत्तर मिळालं तर इंटरव्यू घेणाऱ्याने ठरवावे उत्तर पास आहे कि फेल.

प्रत्येक आयटम ची स्कोरिंग M- CHAT- R / F स्कोरिंग शीट वर करावी . M- CHAT- R / F वर कुठल्याही दोन आयटम वर फेल झालेल्या मुलाला ऑटिझम (स्वमग्नता) ची रिस्क आहे . जर मुल M- CHAT- R / F वर पॉजिटीव्ह आहे तर त्याला लवकरात लवकर early intervention आणि निदानाच्या तपासांकरता पाठवावे .

जर डॉक्टर्स , व्यावसायिक , कुठलाही स्पेशलिस्ट किंवा आई वडील यांना ऑटिझम (स्वमग्नता) ची लक्षणे दिसली तरM- CHAT- R किंवा M- CHAT- R / F च्या स्कोर कडे दुर्लक्ष करून त्यांना ऑटिझम (स्वमग्नता) स्पेशलिस्ट कडे जाण्याचा सल्ला द्यावा .

© 2009 Diana Robins, Deborah Fein, & Marianne Barton
Translated in Marathi by Dr. Avinash S. Bhosale (Pediatrician), 2019

एम-चैट-आर फॉलो  अप को स्कोरिंग  शीट (M-CHAT-R Follow- Up Scoring Sheet)

लक्ष्य द्या: होय किंवा नाही ऐवजी पास/फेल लिहिलेले आहे

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | तुम्ही  खोलीतल्या एखाद्या वस्तू कडे बोटाने इशारा केला तर तुमचे मुलं त्याकडे बघते का?<br>(**उदारणार्थ** जर तुम्ही एखाद्या खेळणे किंवा प्राण्याकडे इशारा केला तर तुमचे मुल त्याकडे बघते का?) | पास | फेल |
| 2 | तुमच्या मुलाला ऐकू येत नाही असे तुम्हाला वाटते का? | पास | फेल |
| 3 | तुमचे मुल बनावटी किंवा काल्पनिक खेळ खेळते का?<br>( **उदाहरणार्थ**  जसे रिकाम्या कपातून पाणी पिण्याचे किंवा फोन वर बोलण्याचे नाटक करणे . बाहुली किंवा टेडी बेअर ला खाऊ  घालण्याचे नाटक करणे ) | पास | फेल |
| 4 | तुमच्या मुलाला वस्तूंवर चढणे आवडते का?<br>( **उदाहरणार्थ**  फर्निचर झोका  किंवा पायऱ्या वर चढणे) | पास | फेल |
| 5 | तुमचे मुल त्याची बोट त्याच्या डोळयासमोर असामान्य प्रकारे हलवतो का?<br>(  जसे डोळयासमोर बोटं लवचिकपणे हलवणे) | पास | फेल |
| 6 | तुमच्या मुलाला काही हवे असल्यास किंवा काही मदतीसाठी तो/ती एका बोटाने इशारा करून सांगू शकतो/ते का ?    ( जसे हवी असलेली खाण्याच्या वस्तू पर्यंत हात पोहचू शकत नाही किंवा खेळण्या कडे इशारा करणे) | पास | फेल |
| 7 | तुमचे मुलं एखाद्या रोचक वस्तू कडे एका बोटाने दाखवण्याचा प्रयत्न करते का ?<br>(  उदाहरणार्थ  आकाशात विमान , रस्तावरचा एखादा ट्रककडे  इशारा करणे) | पास | फेल |
| 8 | तुमचे मूल इतर मुलांमध्ये रुची/इंटरेस्ट घेते का?<br>( **उदाहरणार्थ**  तुमचे मुल इतर मुलांना बघुन हसते किंवा त्यांच्या जवळ जाते) | पास | फेल |
| 9 | तुमचे मुल वस्तू तुमच्याकडे घेऊन येते का? मदतीसाठी नाही फक्त दाखवण्यासाठी<br>( **उदाहरणार्थ**  फुल , टेडी बेयर किंवा खेळण्यातला ट्रक दाखवणे) | पास | फेल |
| 10 | जर तुम्ही तुमच्या मुलाला नावाने हाक मारली तर तो/ती प्रतिसाद देतो/ते का ?<br>(**उदारणार्थ** तुम्ही तुमच्या मुलाला त्याच्या किंवा तिच्या नावाने हाक मारतात तेव्हा तो/ती  वर पहाणे, बोलणे किंवा करत असलेले काम थांबवतो/ते का ? ) | पास | फेल |
| 11 | जेव्हा तुम्ही तुमच्या मुला/लीला बघून हसतात तेव्हा  तो/ती सुद्धा हसतो/ते का ? | पास | फेल |


© 2009 Diana Robins, Deborah Fein, & Marianne Barton

Translated in Marathi by Dr. Avinash S. Bhosale (Pediatrician), 2019

| | | | |
|---|---|---|---|
| 12 | तुमचे मुल रोजच्या आवाजाने त्रासून जाते का ?<br>(**उदारणार्थ** व्हॅकुम क्लीनर, प्रेशर कुकर, मिक्सर ग्राइंडर किंवा मोठ्या आवाजातले संगीत ऐकून ओरडतो/ते किवा रडतो/ते का ?) | पास | फेल |
| 13 | तुमचे मुल चालते का ? | पास | फेल |
| 14 | जेव्हा तुम्ही तुमच्या मुला/लीशी बोलतात , त्या/तीच्या सोबत खेळतात किंवा त्याला/तिला कपडे घालत असतात तेव्हा तुमचे मुल तुमच्याशी नजर लावते का ? | पास | फेल |
| 15 | तुमचे मुलं तुमची नक्कल करण्याचा प्रयत्न करते का ?<br>(**उदाहरणार्थ** टाटा करणे, टाळी वाजवणे , मनोरंजक आवाज जसे तुम्ही काढता तसे काढणे ) | पास | फेल |
| 16 | काही पहाण्यासाठी जर तुम्ही मान फिरवली तर तुमचं मुलं सुद्धा तुम्ही काय पहात आहेत त्याकडे मान वळवून पाहतो/ते | पास | फेल |
| 17 | तुमचे मुलं तुम्ही त्याच्याकडे पाहावे म्हणून प्रयत्न करते का ?<br>(तुम्ही त्याची प्रशंसा कराला या आशेने तो/ती " बघा! किंवा "मला बघा " ) | पास | फेल |
| 18 | जेव्हा तुम्ही तुमच्या मुलाला काही करण्यासाठी सांगतात तेव्हा त्याला ते कळते का ?<br>(जसे की बिना इशारा किंवा संकेताने तुम्ही म्हणालात “कागद खुर्चीवर ठेव" किंवा दरवाजा बंद कर" तर त्या/तीला ते समजते का? ) | पास | फेल |
| 19 | जर काही नवं घडलं असेल तर, तुम्हाला कसं वाटते ते पाहण्यासाठी तुमचा मुलगा/गी तुमच्या चेहऱ्याकडे कडे पाहतो/ते का ?<br>(**उदाहरणार्थ** एखादया अपरिचित किंवा मनोरंजक आवाज ऐकून किंवा नवीन खेळणं पाहुन तो/ती तुमचा चेहरा पाहतो/ते का?) | पास | फेल |
| 20 | तुमच्या मुलाला/मुलीला जलद हालचालीच्या क्रिया आवडतात का ?<br>(जसे गुडघ्यांवर झुलवणे किंवा हवेत झुलवणे ) | पास | फेल |

© 2009 Diana Robins, Deborah Fein, & Marianne Barton
Translated in Marathi by Dr. Avinash S. Bhosale (Pediatrician), 2019

1. जर तुम्ही खोलीच्या/रूमच्या दुसऱ्या बाजूला बोटाने दाखवले तर....... त्याकडे पाहतो/ते का?




© 2009 Diana Robins, Deborah Fein, & Marianne Barton
Translated in Marathi by Dr. Avinash S. Bhosale (Pediatrician), 2019

2. तुम्ही सांगितलं कि तुमच्या मुला/लीला ऐकू येत नाही अस तुम्हाला वाटते. तुम्हाला अस का वाटते ?

**तो/ती--**

| | | |
|---|---|---|
| अनेकदा आवाजाकडे दुर्लक्ष करतो ? | होय ☐ | नाही ☐ |
| अनेकदा लोकांकडे दुर्लक्ष करतो ? | होय ☐ | नाही ☐ |

**नाही** दोन्हींसाठी → **पास**

**होय** दोन्हींसाठी → **फेल**

**तुमच्या मुलाची ऐकण्याच्या क्षमतेची चाचणी झाली आहे का ?**

**तसेच प्रत्येक मुलासाठी विचारा:**

**होय** | **नाही**

होय →

ऐकण्याच्या क्षमतेची चाचणीचा निष्कर्ष काय होता ?
(खालील पैकी एक निवडा)

ऐकण्याच्या क्षमता सामान्य आहे. ☐

ऐकण्याच्या क्षमतेची सामान्यपेक्षा कमी आहे . ☐

निश्चित माहित नाही . ☐

© 2009 Diana Robins, Deborah Fein, & Marianne Barton
Translated in Marathi by Dr. Avinash S. Bhosale (Pediatrician), 2019

**3 ------ बनावटी/काल्पनिक खेळ खेळतो/ते का ?**

**होय** → कृपया त्याच्या बनावटी खेळाचे एक उदाहरण द्या (*जर पालकांनी खालीलपैकी **<u>पास</u>** उदाहरण न दिल्यास एक-एक करून विचारावे)*

**नाही**

**तो/ती सहसा--**

| | | |
|---|---|---|
| तो/ती कधी खेळण्याच्या चमच्यातून पाणी पितो/ते का ? | होय ☐ | नाही ☐ |
| खेळण्याच्या चमच्या काट्याने खाण्याचे नाटक करतो/ते का ? | होय ☐ | नाही ☐ |
| फोनवर बोलण्याचे नाटक करतो/ते का ? | होय ☐ | नाही ☐ |
| बाहुली किंवा खेळण्यातल्या प्राण्याला खरे किंवा काल्पनिक खाऊ घालण्याचे नाटक करतो/ते का ? | होय ☐ | नाही ☐ |
| गाडी अशी चालवतो/ते की जणू ती काल्पनिक रस्त्यावरून जात आहे . रोबोट, विमान, डॉक्टर किंवा टीचर/शिक्षक असे आवडते पात्र बनण्याचे नाटक करतात. | होय ☐ | नाही ☐ |
| खेळण्याच्या भांड्यात जेवण तयार करण्याचे नाटक करतो/ते | होय ☐ | नाही ☐ |
| चहा/नाश्ता बनवण्याचे नाटक करतो/ते. | होय ☐ | नाही ☐ |
| बाहुली इत्यादींना खेळण्यातल्या गाडी/ट्रक मध्ये बसवण्याचे नाटक करतो/ते जणू काही ते गाडी चालवत आहे किंवा गाडीतून फिरायला जात आहे . | होय ☐ | नाही ☐ |
| झाडू मारणे किंवा पोचा लावणे किंवा गाडी साफ करण्याचे नाटक करतो/ते. | होय ☐ | नाही ☐ |

इतर काही (वर्णन करा) ________________________________

**होय–** वरीलपैकी कुणालाही → **पास**

**नाही –** वरीलपैकी सर्वांसाठी → **फेल**

© 2009 Diana Robins, Deborah Fein, & Marianne Barton
Translated in Marathi by Dr. Avinash S. Bhosale (Pediatrician), 2019

**4. ----- ला वस्तूंवर चढणे आवडते का ?**

**होय**

एखाद्या वस्तूचे उदाहरण द्या ज्यावर त्याला/तिला चढणे आवडते .
*(जर पालकांनी खालीलपैकी **पास** उदाहरण न दिल्यास एक-एक करून विचारावे)*

**नाही**

त्याला/तिला खालीलपैकी कशावर चढणे आवडते ?

| | | |
|---|---|---|
| जिन्याच्या पायरांवर | होय □ | नाही □ |
| खुर्चीवर | होय □ | नाही □ |
| फर्निचरवर | होय □ | नाही □ |
| झोक्यावर | होय □ | नाही □ |

**होय**– वरीलपैकी कुणालाही → **पास**

**नाही** -- वरीलपैकीसर्वांसाठी → **फेल**

© 2009 Diana Robins, Deborah Fein, & Marianne Barton
Translated in Marathi by Dr. Avinash S. Bhosale (Pediatrician), 2019

**5. ------ डोळयांसमोर हाताची बोट असामान्यपणे हलवतो/ते का ?**

**होय**

कृपया मला ह्या हालचालींचे वर्णन करून सांगा
*(जर पालकांनी खालीलपैकी **पास** उदाहरण न दिल्यास एक-एक करून विचारावे)*

**तो/ती कधी –**
(खालील **"पास"** उदाहरणे आहेत)

हातांकडे पाहतो/ते का ? होय ☐ नाही ☐
पिक बु खेळतांना बोटांची हालचाल करतो का ? होय ☐ नाही ☐

**होय** वरीलपैकी दिलेल्या कुठल्याही उदाहरणासाठी

**पास**

**तो/ती कधी –**
(खालील **"फेल"** उदाहरणे आहेत)

स्वतःची बोट डोळ्यांसमोर हलवतो का ? होय ☐ नाही ☐
स्वतःच्या हातांना डोळ्याच्या समोर घेऊन जातो का ? होय ☐ नाही ☐
स्वतःचा हात डोळ्यांच्या कोपराकडे घेऊन जातो का ? होय ☐ नाही ☐
स्वतःच्या हाताला चेहऱ्याच्या जवळ फ्लप करतो का ? होय ☐ नाही ☐
इतर काही (वर्णन करा)-
________________________________________
________________________________________

**नाही** वरील सर्वांसाठी → **पास**

**होय** वरीलपैकी दिलेल्या कुठल्याही उदाहरणासाठी

असे आठवड्यातून दोनपेक्षा जास्त वेळा होते का?

**नाही** → **पास**

**होय** → **फेल**

**नाही** → **पास**

© 2009 Diana Robins, Deborah Fein, & Marianne Barton
Translated in Marathi by Dr. Avinash S. Bhosale (Pediatrician), 2019

**6. तुमचे मुल काही मागण्यासाठी किंवा मदतीसाठी एका बोटाने इशारा करतो/ते का ?**

**होय** → **पास**

**नाही** →

अशी एखादी गोष्ट (उदारणार्थ एखादी खाण्याची गोष्ट/ खेळणे) जी तुमच्या मुलाला पाहिजे परंतु तो/ती तिथपर्यंत पोहचू शकत नाही अशा वेळी तो/ती कशी घेतो/ते ?
*(जर पालकांनी खालीलपैकी* ***पास*** *उदाहरण न दिल्यास एक-एक करून विचारावे)*

**तो/ती**

| | | |
|---|---|---|
| स्वतःच्या हाताने वस्तू पर्यंत पोहचण्याचा पर्यंत करतो/ते | होय □ | नाही □ |
| तुम्हाला त्यावस्तू पर्यंत घेऊन जातो/ते | होय □ | नाही □ |
| ती वस्तू स्वतः घेण्याचा प्रयत्न करतो/ते | होय □ | नाही □ |
| आवाजाने/शब्दाने वस्तू मागतो/ते | होय □ | नाही □ |

**होय** ..वरीलपैकी कुठल्याही उदाहरणासाठी →

जर तुम्ही म्हणालात “मला दाखव” तर तो/ती त्याकडे बोटाने इशारा करतो/ते का ?


**होय** → **पास**

**नाही** → **फेल**

**नाही** ..वरील सर्वांसाठी → **फेल**


© 2009 Diana Robins, Deborah Fein, & Marianne Barton
Translated in Marathi by Dr. Avinash S. Bhosale (Pediatrician), 2019

7. * **जर मुलाखतकाराने/ इंटरव्ह्यू घेणाऱ्याने नुकताच प्रश्न ६ विचारला असेल तर येथून सुरवात करा**: आत्ताच आपण काही मागण्यासाठी इशारा  करण्याबाबत बोललो. **सगळ्यांना विचारा →** तुमचा/ची मुलगा/गी तुम्हाला एखादी रोचक गोष्ट दाखवण्यासाठी एका बोटाने इशारा  करतो/ते का ?





© 2009 Diana Robins, Deborah Fein, & Marianne Barton
Translated in Marathi by Dr. Avinash S. Bhosale (Pediatrician), 2019

## 8. ----- ला/ली इतर मुलांमध्ये आवड आहे का ?




© 2009 Diana Robins, Deborah Fein, & Marianne Barton
Translated in Marathi by Dr. Avinash S. Bhosale (Pediatrician), 2019

9. ----- तुम्हाला दाखवण्यासाठी वस्तू उचलून घेऊन येतो का ? मदतीसाठी नाही तर केवळ तुम्हाला दाखवण्यासाठी.





© 2009 Diana Robins, Deborah Fein, & Marianne Barton
Translated in Marathi by Dr. Avinash S. Bhosale (Pediatrician), 2019

**10. जेव्हा----- ला/ली नावाने हाक मारता तेव्हा तो/ती काय प्रतिसाद देतो/ते ?**

**होय**

कृपया एखादे उदाहरण देऊन सांगा की जेव्हा----- ला/ली नावाने हाक मारता तेव्हा तो/ती काय प्रतिसाद देतो/ते ? *((जर पालकांनी खालीलपैकी **पास** उदाहरण न दिल्यास एक-एक करून विचारावे)*

तो/ती
(*खालील प्रतिक्रिया पास उदाहरणे आहेत)*

| | | |
|---|---|---|
| वर बघतो/ते का ? | होय □ | नाही □ |
| बोलतो/ते किंवा बडबडतो/ते ? | होय □ | नाही □ |
| करत असलेलं काम बंद करतो/ते का ? | होय □ | नाही □ □ |

**नाही**

जर तो/ती काही गंमतीशीर किंवा मजेदार करत नसेल तेव्हा तुम्ही त्याला/तिला नावाने हाक मारता तेव्हा तो/ती काय करतो. (*जर पालकांनी खालीलपैकी पास उदाहरण न दिल्यास एक-एक करून विचारावे)*

तो/ती
*(खालील प्रतिक्रिया फेल उदाहरणे आहेत)*

| | | |
|---|---|---|
| कुठलाही प्रतिसाद देत नाही | होय □ | नाही □ |
| ऐकतो असं वाटत पण पालकांकडे दुर्लक्ष करतो | होय □ | नाही □ |
| पालक त्याच्या/तिच्या तोंडासमोर असतील तेव्हाच प्रतिसाद देतो/ते | होय □ | नाही □ |
| स्पर्श केल्यावरच प्रतिसाद देतो/ते | होय □ | नाही □ |

**होय** केवळ पास उदाहरणांसाठी → **पास**

**होय...** **पास** आणि **फेल** दोन्ही उदाहरणासाठी

बहुतेकदा तो/ती काय करतो/ते ?


**पास** प्रतिक्रिया → **पास**

**फेल** प्रतिक्रिया → **फेल**

**होय** फक्त **फेल** उदाहरणासाठी → **फेल**

© 2009 Diana Robins, Deborah Fein, & Marianne Barton
Translated in Marathi by Dr. Avinash S. Bhosale (Pediatrician), 2019

**11. जेव्हा तुम्ही----च्या कडे बघून हसतात तेव्हा तो/ती तुमच्याकडे बघून हसतो/ते का ?**




© 2009 Diana Robins, Deborah Fein, & Marianne Barton
Translated in Marathi by Dr. Avinash S. Bhosale (Pediatrician), 2019

## 12. -----दररोजच्या आवाजाने नाराज होतो का ?

**होय** → 

तुमचा मुलगा/गी खालील आवाज ऐकल्यावर नकारात्मक प्रतिक्रिया देतो/ते का ?

| | | |
|---|---|---|
| वाशिंग मशीन | होय ☐ | नाही ☐ |
| लहान बाळाचे रडणं | होय ☐ | नाही ☐ |
| व्हॅक्यूम क्लिनर | होय ☐ | नाही ☐ |
| रहदारी | होय ☐ | नाही ☐ |
| लहान बाळांच ओरडणे/ रडणे | होय ☐ | नाही ☐ |
| उंच आवाजातली गाणी | होय ☐ | नाही ☐ |
| टेलेफोन किंवा दरवाजाच्या बेलचा आवाज | होय ☐ | नाही ☐ |
| गोंगाटाच्या जागा उदारणार्थ सुपरमार्केट | होय ☐ | नाही ☐ |
| किंवा हॉटेल | होय ☐ | नाही ☐ |

इतर काही (वर्णन करा)

______________________________

______________________________

**नाही** → **पास**

→ **होय** दोन किंवा अधिक उदाहरणांसाठी

→ तुमचे मुलगा/गी अश्या आवाजांना कशी प्रतिक्रिया देतो/ते? (*जर पालकांनी खालीलपैकी **पास** उदाहरण न दिल्यास एक-एक करून विचारावे*)

**तुमचा मुलगा/गी**
(*खालील प्रतिक्रिया पास उदाहरणे आहेत*)

| | | |
|---|---|---|
| शांतपणे कान झाकून घेतो/ते | होय ☐ | नाही ☐ |
| आवाज आवडत नसल्याचे तुम्हाला सांगतो/ते | होय ☐ | नाही ☐ |

**तुमचा मुलगा/गी**
(*खालील प्रतिक्रिया फेल उदाहरणे आहेत*)

| | | |
|---|---|---|
| किंचाळतो | होय ☐ | नाही ☐ |
| रडतो | होय ☐ | नाही ☐ |
| नाराज असतो तेव्हा स्वतःचे कान झाकून घेतो/ते | होय ☐ | नाही ☐ |


**होय** फक्त **पास** उदाहरणांसाठी → **पास**

होय... **पास** आणि **फेल** दोन्ही उदाहरणासाठी → बहुतेकदा तो/ती काय करतो/ते ?
- **पास** प्रतिक्रिया → **पास**
- **फेल** प्रतिक्रिया → **फेल**

होय फक्त **फेल** उदाहरणांसाठी → **फेल**


© 2009 Diana Robins, Deborah Fein, & Marianne Barton
Translated in Marathi by Dr. Avinash S. Bhosale (Pediatrician), 2019

**13. ----- चालतो/ते का ?**




© 2009 Diana Robins, Deborah Fein, & Marianne Barton
Translated in Marathi by Dr. Avinash S. Bhosale (Pediatrician), 2019

**14. जेव्हा तुम्ही ----- बोलत , खेळत असतात किंवा तिचे/ त्याचे कपडे बदलवत असतात तेव्हा तो/ती तुमच्या डोळयात बघतो/ते ?**




© 2009 Diana Robins, Deborah Fein, & Marianne Barton
Translated in Marathi by Dr. Avinash S. Bhosale (Pediatrician), 2019

**15. ------ तुमची नक्कल करण्याचा प्रयत्न करतो/ते का ?**

**होय**

कृपया तो/ती नक्कल करत असल्याचे एखादे उदाहरण द्या
*(जर पालकांनी खालीलपैकी **<u>पास</u>** उदाहरण न दिल्यास एक-एक करून विचारावे)*

**नाही**

**तुमचे मुल तुमची नक्कल करते का ? जर तुम्ही**

| | | |
|---|---|---|
| तुमची जीभ बाहेर काढली | होय ☐ | नाही ☐ |
| गंमतीशीर आवाज काढले | होय ☐ | नाही ☐ |
| बायबाय/ टाटा केले | होय ☐ | नाही ☐ |
| टाळ्या वाजवल्या | होय ☐ | नाही ☐ |
| शुsss म्हणण्यासाठी तोंडावर बोट ठेवले | होय ☐ | नाही ☐ |
| फ्लाइंग किस देणे | होय ☐ | नाही ☐ |

इतर काही (वर्णन करा):

________________________________________

________________________________________

**होय**
दोन किंवा अधिक उदाहरणांसाठी


**पास**

**होय**
एकासाठी किंवा कुणासाठीही नाही

**फेल**

© 2009 Diana Robins, Deborah Fein, & Marianne Barton
Translated in Marathi by Dr. Avinash S Bhosale (Pediatrician), 2019

**16. जर तुम्ही मान वळवून काहीतरी बघत असाल तर....... सुद्धा तिकडे वळून बघतो का ?**




© 2009 Diana Robins, Deborah Fein, & Marianne Barton
Translated in Marathi by Dr. Avinash S. Bhosale (Pediatrician), 2019

## 17. ......तुम्ही तिच्या/त्याचाकडे पहावे म्हणून प्रयत्न करतो/ते का ?

**होय**

तुम्ही तिच्या/त्याचाकडे पहावे म्हणून ती/तो काय प्रयत्न करतो/ते याचे कृपया एक उदाहरण द्या
*(जर पालकांनी खालीलपैकी* ***पास*** *उदाहरण न दिल्यास एक-एक करून विचारावे)*

**नाही**

**तो/ती**

बघा किंवा मला बघा अस म्हणतो का ? होय ☐ नाही ☐
बा' बा मा मा करतो/ते किंवा कुठलातरी आवाज काढतो/ते का , जेणेकरून तुम्ही तो/ती काय करत आहे ते बघता ? होय ☐ नाही ☐
तुम्ही त्याच/तीच कौतुक कराल म्हणून तुच्याकडे बघतो/ते ? होय ☐ नाही ☐
तुम्ही त्याच्या/तिच्याकडे पहाल म्हणून बघत राहतो/ते का ? होय ☐ नाही ☐
इतर काही (वर्णन करा)


______________________________
______________________________

**होय,** कुणासाठीही → **पास**

**होय** , एकासाठी सुद्धा नाही → **फेल**


© 2009 Diana Robins, Deborah Fein, & Marianne Barton
Translated in Marathi by Dr. Avinash S. Bhosale (Pediatrician), 2019

## 18. तुम्ही जेव्हा..... काही करायला सांगतात तेव्हा त्याला/तिला कळते का ?




© 2009 Diana Robins, Deborah Fein, & Marianne Barton
Translated in Marathi by Dr. Avinash S. Bhosale (Pediatrician), 2019

**19. जर काही नवं घडलं असेल तर------ तुम्हाला कसं वाटते ते पहाण्यासाठी तुमच्या चेहऱ्याकडे कडे पहातो/ते का ?**




© 2009 Diana Robins, Deborah Fein, & Marianne Barton
Translated in Marathi by Dr. Avinash S. Bhosale (Pediatrician), 2019

## 20. -----ला हालचालीच्या/ मुव्हमेंटच्या क्रिया/ आवडतात का ?

**होय**

त्याला/तिला बाउंस किंवा झुलवल तर आवडते का ?

**होय** → **पास**

**नाही**

**नाही**

जेव्हा तुम्ही त्याला/तिला बाउंस किंवा झुलवता तेव्हा त्याचा प्रतिसाद काय असतो ?
*(जर पालकांनी खालीलपैकी* ***पास*** *उदाहरण न दिल्यास एक-एक करून विचारावे)*

**तुमचे मुल**

| | | |
|---|---|---|
| स्मित करते किंवा हसते का ? | होय ☐ | नाही ☐ |
| बा-बा मा-मा करतो/ते किंवा बोलतो/ते का ? | होय ☐ | नाही ☐ |
| आणखी हव आहे हे सांगण्यासाठी हात पुढे करतो/ते | होय ☐ | नाही ☐ |
| इतर काही (वर्णन करा) | होय ☐ | नाही ☐ |

______________________________

**होय** वर दिलेल्या एखाद्या उदाहरणासाठी (किंवा दुसरे एखादे पास उदाहरण) → **पास**

**नाही,** सर्वांसाठी → **फेल**

© 2009 Diana Robins, Deborah Fein, & Marianne Barton
Translated in Marathi by Dr. Avinash S. Bhosale (Pediatrician), 2019